**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587


# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे





वर्ष ५ । अंक ३०३ । गुरुवार ३ सप्टेंबर २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# कोतवाली पोलिसांचा ट्रिपल धमाका

## एकाच दिवशी नशेची औषधे व गांजा जप्त तर चोरीचे मोबाईल हस्तगत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कोतवाली पोलिसांनी धडक कारवाई करत एकाच दिवसात तब्बल तीन वेगवेगळे गुन्हे उघडकीस आणले आहेत. या धडक मोहिमेत पोलिसांनी आरोग्यास हानिकारक असणारे मेफेनटरमाईनचे ४० इंजेक्शन, तब्बल १ लाख ८२ हजार ५०० रुपये किमतीचा गांजा आणि चोरीचे दोन मोबाईल असा मुद्देमाल जप्त केला आहे.

गांधी मैदान मार्कंडेय शाळेजवळील मोकळ्या जागेत डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय विकण्यास बंदी असलेले नशेचे औषध विकण्यासाठी काही तरुण येणार असल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख यांना मिळाली होती. पोलिसांनी पंचांसमक्ष छापा टाकून प्रताप अशोक अकोलकर (वय २१), तेजस गंगाधर वारुळे (वय २१) आणि तेजस अमित उळागड्डे (वय २२) या ■ पान ४ वर

### केडगावमध्ये परसबागेत लावलेले गांजाचे झाड जप्त

केडगाव परिसरातील वैष्णवनगर येथे विकास बाळू उमाप (वय ३५) याने राहत्या घराच्या कंपाऊंडमध्ये बेकायदेशीर गांजाचे झाड लावल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांना मिळाली. सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे यांच्या पथकाने घटनास्थळी छापा मारून १८.२५ किलोग्रॅम वजनाचे व १ लाख ८२ हजार ५०० रुपये किमतीचे गांजाचे झाड जप्त केले.

### यांनी केली कारवाई

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे, प्रशिक्षणार्थी उपविभागीय पोलीस अधिकारी सौ. कल्पना पवार, कोतवालीचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि कुणाल सपकाळे, पोसई गणेश देशमुख, पोहेकॉ सूर्यकांत डाके, गुन्हे शोध पथकाचे पोहेकॉ बाळकृष्ण दौड, मपोहेकॉ रोहिणी दरंदले, पोहेकॉ राहुल शिंदे, पोहेकॉ विनोद बोरगे, पोहेकॉ साबीर शेख, पोहेकॉ विशाल दळवी, पोहेकॉ दशरथ थोरात. पोकॉ दीपक रोहकले, शिरीष तरटे, सूरज कदम, सत्यम शिंदे, दत्तात्रय कोतकर, अतुल काजळे, अमोल गाडे, सचिन लोळगे, महेश पवार, रमेश शिंदे, संकेत धीवर, अतुल लाटे, राहुल मासाळकर, गंगाधर आंग्रे, मपोकॉ पल्लवी रोहकले. दक्षिण मोबाईल सेलचे पोकॉ राहुल गुंडू, पोकॉ अरुण सांगळे यांचा पथकात सहभाग होता.

# दुष्काळ जाहीर करून करपलेल्या पिकांचे तातडीने पंचनामे करा – खासदार लंके

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** पावसाने दडी मारल्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्यातील अनेक भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, शासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने दुष्काळ जाहीर करावा. तसेच पावसाअभावी करपून व जळून गेलेल्या पिकांचे त्वरित पंचनामे करून संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी खासदार नीलेश लंके यांनी केली आहे.

खा. लंके म्हणाले, जामखेड तालुक्यात शाळेच्या नवीन खोल्यांच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी गेलो असताना परिसरातील शेतशिवारातील पिकांची स्थिती प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाली. यावेळी अनेक ठिकाणी पावसाअभावी पिके करपून गेल्याचे अत्यंत गंभीर चित्र दिसून आले. शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने पेरणी करून बियाणे, खते, मशागत व इतर शेतीकामांवर मोठा खर्च केला आहे. मात्र, अपेक्षित पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट कोसळले असल्याचे खासदार लंके यांनी म्हटले आहे.

पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीचे तातडीने सर्वेक्षण करून करपलेल्या पिकांचे पंचनामे करण्यात यावेत. मात्र, केवळ पंचनामे करून कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण करण्यात काहीही अर्थ नाही. पंचनामे झाल्यानंतर प्रत्यक्ष संकटग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळाली पाहिजे, अशी स्पष्ट भूमिका खासदार लंके यांनी मांडली.

आज शेतकरी अत्यंत कठीण परिस्थितीतून जात आहे. शेतीवरील मोठा खर्च करूनही पिके हातातून जाण्याची वेळ त्याच्यावर आली आहे. त्यामुळे शासनाने विलंब न करता वास्तव परिस्थितीचा विचार करून शेतकऱ्यांना तात्काळ दिलासा द्यावा, असे खासदार लंके यांनी सांगितले.

दुष्काळी परिस्थितीचा परिणाम केवळ पिकांवरच नव्हे, तर पशुधनावरही होण्याची शक्यता आहे. पाण्याची टंचाई आणि चाऱ्याचा प्रश्न गंभीर होण्यापूर्वीच शासनाने आवश्यक त्या उपाययोजना करणे गरजेचे आहे. जिल्ह्यात आवश्यक त्या ठिकाणी चारा डेपो सुरू करावेत तसेच जनावरांसाठी छावण्यांची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणीही खासदार नीलेश लंके यांनी केली आहे.

शासनाने परिस्थिती अधिक गंभीर होण्याची वाट न पाहता तातडीने निर्णय घ्यावा. दुष्काळग्रस्त भागांची पाहणी करून पिकांच्या नुकसानीचे पंचनामे जलदगतीने पूर्ण करावेत आणि पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई व आवश्यक आर्थिक मदत त्वरित उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी खासदार लंके यांनी केली आहे. पावसाअभावी संकटात सापडलेल्या बळीराजाला केवळ आश्वासनांची नव्हे, तर तातडीच्या आणि प्रत्यक्ष मदतीची गरज असल्याचेही खासदार नीलेश लंके यांनी स्पष्ट केले आहे.

# जायकवाडीचे पाणी पूर्वभागाला मिळण्यासाठी सर्वपक्षीय एकजूट

## हक्काच्या पाण्यासाठी निर्णायक पाऊल : पूर्व भागातील ३२ गावांचा एल्गार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–** शेवगाव तालुक्यातील पूर्व भागातील ३२ गावांना हक्काचे पाणी अगोदर द्यावे व मगच दुसऱ्या तालुक्याचा विचार करावा. हे पाणी आमच्या हक्काचे असून पाणी घेतल्याशिवाय गप्प बसणार नाहीत. त्यामुळे पूर्व भागातील शेतकऱ्यांनी व युवकांनी हेही लक्षात घ्यावे की, संघर्ष केल्याशिवाय पाणी मिळणार नाही. त्यामूळे पक्षीय जोडे बाजूला ठेवून पाण्यासाठी एकत्र या असे प्रतिपादन सर्वपक्षीय पाणी परिषद कृती समितीचे अध्यक्ष, ॲड.शिवाजीराव काकडे यांनी बोधेगाव येथे केले.

आज दि.(०३) रोजी जायकवाडी जलाशयातून शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागाला हक्काचे पाणी मिळावे, तसेच परिसरातील तलाव, बंधारे, नालाबंडिंग व पाणलोट क्षेत्र या पाण्याने भरून मिळावे यासाठी पूर्व भागातील ३२ गावातील शेतकरी, युवक महिला व ग्रामस्थांची बोधेगाव येथे बैठक घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. बैठकीस माजी ■ पान ४ वर


(छाया : बाबा पालवे)

तालुक्याच्या पूर्व भागातील ३२ गावांसाठी पाणी मिळावे यासाठी आजपर्यंत कोणत्याही सत्ता भोगलेल्या पुढाऱ्यांनी एक ब्र शब्द देखील काढला नाही. या तालुक्याच्या पूर्व भागातील दुष्काळी गावांना ॲड. शिवाजीराव काकडे साहेब फक्त आणि फक्त तुम्हीच पाणी देऊ शकता त्यामुळे सर्व युवक, शेतकरी व महिलांना तुमच्या पाठीशी उभा करू.

– माणिक गर्जे, ग्रा.प.सदस्य, बोधेगाव.

# अटक नव्हे चौकशीसाठी बोलावले, 'त्या' वृत्ताबाबत जाहीर दिलगिरी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** फॉर्च्युनर कारच्या ३४ लाख ५० हजार रुपयांच्या व्यवहारात उर्वरित ६ लाख ५५ हजार रुपयांची रक्कम न देता वाहनाची परस्पर विल्हेवाट लावल्याप्रकरणी कर्जत येथील माजी नगराध्यक्षांचे पती सचिन विठ्ठलराव घुले (रा. पाटील गल्ली, कर्जत) यांना तोफखाना पोलिसांनी अटक केल्याचे वृत्त काल दैनिक आकर्षणमध्ये प्रसिद्ध झाले होते. परंतु तोफखाना पोलीस ठाण्यात घुलेंवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्यांना चौकशीसाठी पोलीस ठाण्यात बोलावले होते. त्यांना अटक झालेली नाही, असे पोलिस सुत्रांनी सांगितले.

काल, दिनांक ३ सप्टेंबरच्या अंका प्रसिद्ध झालेल्या ''कर्जतच्या माजी नगराध्यक्ष पतीला बेड्या'' या बातमीबाबत आम्ही हे स्पष्टीकरण व जाहीर दिलगिरी व्यक्त करत आहोत. प्रत्यक्षात, आरोपी सचिन घुले यांना अटक करण्यात आलेली नाही. पोलिसांनी त्यांना केवळ चौकशीसाठी पोलीस ठाण्यात बोलावून घेतले होते. तसेच या गुन्ह्यातील संबंधित फॉर्च्युनर वाहन पोलिसांनी योग्य कायदेशीर प्रक्रियेचा भाग म्हणून ताब्यात घेतल्याची माहिती तपासी अंमलदार भागवत बांगर यांनी दिली.

# एमआयडीसी परिसरातील कुंटणखान्यावर छापा

## एलसीबीच्या कारवाईत तीन महिलांची सुटका

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेने एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या कुंटणखान्याचा पर्दाफाश केला असून, या कारवाईत तीन पीडीत महिलांची सुटका करण्यात आली आहे.

गोपनीय माहितीनुसार एलसीबीच्या पथकाने एमआयडीसी परिसरातील गजानन कॉलनी येथील रहिवासी महिलेच्या घरात बनावट ग्राहक पाठवून खात्री केली असता तेथे कुंटणखाना सुरू असल्याची स्पष्ट झाले. प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक कल्पना पवार आणि एलसीबीचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक संदीप दरवडे व त्यांच्या पथकाने केलेल्या कारवाईत मुख्य आरोपी रजनी डहाळे हिला ताब्यात घेण्यात आले. घरझडतीदरम्यान तिथे तीन पीडित महिला आढळून आल्या. आर्थिक फायद्यासाठी ग्राहकांकडून पैसे घेऊन या महिलांकडून जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करवून घेतला जात असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी तिन्ही पीडित महिलांची सुटका केली आहे.

स्वतःच्या उपजीविकेसाठी महिलांचा गैरवापर करणाऱ्या आरोपी रजनी डहाळेविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात स्त्रिया व मुलींचे अनैतिक व्यापारास (प्रतिबंध) कायदा १९५६ (पिटा) चे कलम ३, ४, ५, ७ आणि ८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास एमआयडीसी पोलीस करत आहेत.

कारवाईत यांचा सहभाग
ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार ■ पान ४ वर




## दै. आकर्षण निवडक

### शहरात ६ सप्टेंबरला 'मनचाहे गीत' संगीत मैफल व माधवबाग 'विजयोत्सव २०२६'



अहिल्यानगर - 'ऋणानुबंध' बहुउद्देशीय संस्था व माधवबाग (अहिल्यानगर) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दिनांक ६ सप्टेंबर २०२६ रोजी 'मनचाहे गीत' या सुरेल संगीत मैफलीचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. ''संगीत साधना हीच उत्तम आरोग्याची गुरुकिल्ली आहे'' या संकल्पनेवर आधारित या संगीतमय सायंकाळी माधवबाग प्रस्तुत 'विजयोत्सव २०२६' हा प्रेरणादायी सन्मान सोहळा देखील पार पडणार आहे.हा सोहळा रविवारी सायंकाळी ४:०० वाजता झोपडी कॅन्टीन परिसरातील माऊली सभागृह, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला आहे. अहिल्यानगरमध्ये गेल्या दहा वर्षांपासून डॉ. स्वाती कुमठेकर यांच्या नेतृत्वाखाली माधवबाग क्लिनिक आणि हॉस्पिटल उत्कृष्ट वैद्यकीय सेवा देत आहे. तसेच अजित रोकडे यांच्या अध्यक्षतेखाली 'ऋणानुबंध' संस्था विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे. या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात भारतातील आघाडीच्या हृदयविकार उपचार साखळीचे (माधवबाग) संस्थापक डॉ. रोहित माधव साने हे उपस्थितांना आरोग्यदायी आयुष्याविषयी मोलाचे मार्गदर्शन करणार आहेत. तसेच, जिद्दीने गंभीर आजारांवर मात केलेल्या रुग्णांचा याप्रसंगी विशेष सन्मान करण्यात येणार आहे. या सोहळ्याला डॉ. रोहित साने यांच्यासोबतच स्नेहालयाच्या अध्यक्षा श्रीमती प्रीती भोंबे, उद्योजक गौरव फिरोदिया, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे गायक पवन नाईक आणि रावसाहेब पटवर्धन स्मारक समितीचे सचिव रवींद्र शितोळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. प्रवेश विनामूल्य असून, पास आवश्यक आहेत. कार्यक्रमाचे प्रवेश पास विनामूल्य उपलब्ध असून, अधिक माहिती व पाससाठी 'श्री स्वामी समर्थ मोबाईल' (महेश घावटे: ७३५०७८१५१५ / ९४२०६३५०९६ / ९८२३८११११९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. स्वाती कुमठेकर, अजित रोकडे, सारिका रघुवंशी, प्रशांत बंडगर व ऋणानुबंध परिवाराने केले आहे.

### शिक्षक आमदार किशोर दराडे यांचे अहिल्यानगरमध्ये सोमवारी शिक्षक दरबार

अहिल्यानगर - अहिल्यानगर जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत नाशिक विभागाचे शिक्षक आमदार किशोर दराडे यांच्या उपस्थितीत शिक्षक दरबार होणार आहे. ही विशेष बैठक सोमवार दि.७ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता जिल्हा परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात पार पडणार आहे. या बैठकीसाठी पुणे विभागीय उपसंचालक यांची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याची माहिती त्यांचे स्वीय सहाय्यक हरीष मुंढे व वैभव सांगळे यांनी दिली. या बैठकीस माध्यमिक शिक्षणाधिकारी, वेतन अधीक्षक तसेच लेखाधिकारी शिक्षण विभाग उपस्थित राहणार असून, शिक्षण विभागाशी संबंधित प्रलंबित कामांबाबत थेट चर्चा केली जाणार आहे. जिल्ह्यातील ज्या मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विविध प्रकरणे प्रलंबित असतील त्यांनी आवश्यक कागदपत्रांसह बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.तसेच संबंधितांनी आपल्या समस्या, तक्रारी अथवा प्रश्न बैठकीपूर्वी व्हॉट्सॲपद्वारे पाठवावेत, असेही सांगण्यात आले आहे. स्वीय सहाय्यक हरीष मुंढे यांच्या व्हॉट्सॲप क्रमांक ७५८८०१४००५ आणि ८२७५५२२५२६ वर प्रश्न पाठविण्याचे सांगण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर सर्व संघटनांच्या पदाधिकारी व शिक्षक सदस्यांनी बैठकीस उपस्थित राहून विविध प्रश्न मांडावेत, असे आमदार दराडे यांच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. या बैठकीमुळे शिक्षण विभागातील रखडलेली प्रकरणे, वेतन, सेवा विषयक अडचणी तसेच प्रशासकीय प्रश्न मार्गी लावण्याचे काम केले जाणार आहे.



## पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने आयोजित महाप्रसादाचा असंख्य भाविकांनी घेतला लाभ

**पद्मशाली समाजातील 'पप्पू बुवा'चा अनेकांनी घेतला लाभ; नंदीवर विराजमान महादेवाची मूर्ती ठरली आकर्षण**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्रावण महिन्यातील तिसऱ्या श्रावणी सोमवारनिमित्त पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने श्री मार्कंडेय शैक्षणिक संकुल, नेप्ती नाका जवळ येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य महाप्रसाद भंडाऱ्याचा असंख्य भाविकांनी लाभ घेतला. महर्षी श्री मार्कंडेय महामुनी यांच्या महाआरतीने महाप्रसादाची सुरुवात करण्यात आली. यावेळी अजय म्याना, गोपालशेठ मंगलारप व सुशांत जाधव यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. महाप्रसादाच्या ठिकाणी आकर्षक सजावट करण्यात आली होती. नंदीवर विराजमान झालेली भगवान महादेवांची आकर्षक मूर्ती भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेत होती. तसेच महर्षी श्री मार्कंडेय यांची सुंदर मूर्तीही याठिकाणी ठेवण्यात आली होती.

यंदाच्या महाप्रसादाचे विशेष आकर्षण ठरले ते पद्मशाली समाजातील प्रसिद्ध 'पप्पू बुवा'चे. 'पप्पू' म्हणजे वरण, 'बुवा' म्हणजे भात आणि त्यासोबत शिरा असा पारंपरिक महाप्रसाद भाविकांसाठी ठेवण्यात आला होता. या पारंपरिक महाप्रसादाचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. धार्मिक वातावरणात पार पडलेल्या या महाप्रसादामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. महाप्रसाद यशस्वी करण्यासाठी पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या कार्यकर्त्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने विशेष परिश्रम घेतले.

पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या माध्यमातून वर्षभर विविध सामाजिक व सेवाभावी उपक्रम सातत्याने राबविले जातात. यामध्ये गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, गरजू व आर्थिक अडचणीत असलेल्या व्यक्तींना मदत, मोफत आरोग्य व इतर शिबिरांचे आयोजन, वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर तसेच विविध सामाजिक उपक्रमांचा समावेश आहे. समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देत सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम ट्रस्टच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

महाप्रसादासाठी अनेक देणगीदार व दानशूर व्यक्तींनी अन्नधान्य, शिधा तसेच आर्थिक स्वरूपात सहकार्य केले. त्यांच्या सहकार्यामुळेच हा महाप्रसाद मोठ्या प्रमाणात आणि उत्साहात यशस्वी झाला. धार्मिकतेसोबतच सेवाभावाची परंपरा जपणाऱ्या पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या या उपक्रमाचे भाविकांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ट्रस्टच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## नेत्रदानाच्या जनजागृतीसाठी जालिंदर बोरुडे यांचा 'नेत्र गौरव' पुरस्काराने सन्मान

**फिनिक्सच्या माध्यमातून ३४ वर्षांपासून नेत्रसेवेच्या अखंड कार्याचा गौरव**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** सामाजिक कार्यकर्ते तथा 'नेत्रदूत' म्हणून ओळख असलेले जालिंदर बोरुडे यांना नेत्रदानाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल साई सूर्य नेत्रसेवेच्या वतीने 'नेत्र गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून गेल्या तब्बल ३४ वर्षांपासून बोरुडे सातत्याने नेत्रसेवा, मोफत नेत्रशिबिरे, मोतिबिंदू शस्त्रक्रिया तसेच मरणोत्तर नेत्रदानाबाबत जनजागृतीचे कार्य करीत आहेत. त्यांच्या या निस्वार्थ सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमास रोटरी क्लबचे शिरीष रायते, ऑप्थॅल्मोलॉजीचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब बोरुडे, डॉ. राजीव चिट गोपीकर, साई सूर्य नेत्रसेवेचे डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. सुधा कांकरिया आदी उपस्थित होते.

जालिंदर बोरुडे यांनी फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील गरजू नागरिकांपर्यंत नेत्रसेवेचा लाभ पोहोचविण्याचे काम केले आहे. आर्थिक परिस्थितीमुळे उपचार घेणे शक्य नसलेल्या अनेक रुग्णांसाठी त्यांनी विविध ठिकाणी नेत्र तपासणी व उपचार शिबिरांचे आयोजन केले. या शिबिरांच्या माध्यमातून गरजू रुग्णांची तपासणी करून त्यांच्यावर मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांसह गरजू रुग्णांना पुन्हा स्पष्टपणे पाहता आले.

केवळ उपचार आणि शस्त्रक्रियांपुरतेच त्यांचे कार्य मर्यादित राहिले नाही. मरणोत्तर नेत्रदान ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, हा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी सातत्याने जनजागृती केली. नेत्रदानाबाबत असलेले गैरसमज दूर करून नागरिकांना नेत्रदानाचे महत्त्व समजावून सांगण्याचे काम त्यांनी केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक नागरिकांनी मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प केला असून, अनेक नेत्रदानाच्या माध्यमातून गरजू व्यक्तींना दृष्टी मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

रोटरी क्लबचे शिरीष रायते म्हणाले, जालिंदर बोरुडे यांच्यासारख्या सेवाव्रती व्यक्ती समाजासाठी प्रेरणादायी असतात. गेल्या अनेक वर्षांपासून त्यांनी कोणत्याही अपेक्षेशिवाय नेत्रसेवेचे कार्य सुरू ठेवले आहे. गरजू रुग्णांच्या डोळ्यांवर उपचार करून त्यांना नवदृष्टी देणे, ही केवळ वैद्यकीय मदत नसून त्यांच्या जीवनाला नवसंजीवनी देण्याचे काम आहे.''

ते पुढे म्हणाले, ''फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून बोरुडे यांनी ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत नेत्रसेवा पोहोचविली. अनेक रुग्णांना मोफत उपचार व शस्त्रक्रियेचा लाभ मिळवून दिला. त्याचबरोबर नेत्रदानासारख्या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर समाजात जागृती निर्माण केली. एखाद्या व्यक्तीच्या निधनानंतर तिचे नेत्रदान झाल्यास त्या माध्यमातून दुसऱ्या व्यक्तीच्या आयुष्यात प्रकाश निर्माण होऊ शकतो. त्यामुळे नेत्रदानाची चळवळ अधिक व्यापक होणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

साई सूर्य नेत्रसेवेचे डॉ. प्रकाश कांकरिया म्हणाले, डोळ्यांशी संबंधित आजारांवर आधुनिक वैद्यकीय उपचार उपलब्ध असले तरी अनेक नागरिक आर्थिक अडचणी, अज्ञान किंवा वेळेअभावी उपचारांपासून वंचित राहतात. अशा नागरिकांपर्यंत नेत्रसेवा पोहोचविण्यासाठी सामाजिक संस्थांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. बोरुडे यांनी गेल्या ३४ वर्षांत सातत्याने नेत्रसेवेचे कार्य केले आहे. विविध भागांत शिबिरे घेऊन गरजू रुग्णांना तपासणी व उपचार उपलब्ध करून देण्याचे त्यांचे काम कौतुकास्पद आहे. नेत्रदानामुळे एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यात प्रकाश येऊ शकतो, ही भावना समाजमनात रुजविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. सुधा कांकरिया यांनीही जालिंदर बोरुडे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

जालिंदर बोरुडे यांनी फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून तब्बल ३४ वर्षांपासून नेत्रसेवेचे कार्य सुरू ठेवले आहे. स्वखर्चाने तसेच विविध सामाजिक संस्था व दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने त्यांनी अनेक ठिकाणी नेत्रतपासणी शिबिरे आयोजित केली. या शिबिरांमध्ये तपासणी झालेल्या गरजू रुग्णांना पुढील उपचारासाठी मार्गदर्शन करण्यात आले. मोतिबिंदू असलेल्या अनेक रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करून त्यांना नवदृष्टी मिळवून देण्यात आली.

नेत्रसेवेबरोबरच अवयवदान आणि नेत्रदान जनजागृती हा त्यांच्या सामाजिक कार्याचा महत्त्वाचा भाग राहिला आहे. मृत्यूनंतरही आपले अवयव व नेत्र गरजूंसाठी उपयोगी पडू शकतात, हा मानवतावादी विचार त्यांनी समाजात रुजविण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून नेत्रदानाबरोबरच अवयवदान जनजागृती आणि विविध सामाजिक उपक्रमही राबविले जात आहेत. समाजातील वंचित, गरजू आणि दुर्बल घटकांना मदतीचा हात देत सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्य संस्थेच्या माध्यमातून सुरू आहे. या दीर्घकाळाच्या सेवाभावी कार्याची दखल घेऊन साई सूर्य नेत्रसेवेने जालिंदर बोरुडे यांना 'नेत्र गौरव' पुरस्काराने गौरविले.

## मराठा आरक्षणासाठी पैठण तालुक्यात रास्ता रोको; वाहतूक ठप्प

**मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या पाचव्या दिवशी आंदोलन; शासनाने तातडीने निर्णय घेण्याची मागणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी पैठण तालुका मराठा समाजाच्या वतीने बुधवारी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे छत्रपती संभाजीनगर, शेवगाव आणि पाचोड मार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली.

मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा बुधवारी पाचवा दिवस असून, त्यांच्या प्रकृतीबाबत मराठा समाजामध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर तातडीने ठोस निर्णय घ्यावा, या मागणीसाठी आंदोलकांनी रस्त्यावर उतरून सरकारचे लक्ष वेधले.

रास्ता रोकोमुळे प्रमुख मार्गांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. आंदोलकांनी मराठा आरक्षणाच्या मागणीच्या घोषणा देत शासनाने प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी केली. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात आले.

शासनाने मराठा समाजाच्या मागण्यांची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने निर्णय घ्यावा; अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा यावेळी आंदोलकांनी दिला.

## एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीची ५२ वी राष्ट्रीय अबॅकस स्पर्धा उत्साहात

**ज्ञान आणि तंत्रज्ञानाची कास सोडू नका; अबॅकससारख्या नव्या संकल्पनांचा स्वीकार करा – आमदार विक्रमसिंह पाचपुते**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** वेगवान गणिती गणना, विलक्षण एकाग्रता, स्मरणशक्ती आणि आत्मविश्वासाचा अद्भुत संगम अनुभवायला मिळालेल्या एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीच्या ५२ व्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.विविध शहरांमधून आलेल्या तब्बल १,४०० विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे या राष्ट्रीय स्पर्धेला ज्ञानोत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले.

या प्रसंगी श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघाचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भविष्यातील जग हे ज्ञान, तंत्रज्ञान आणि नवसंकल्पनांवर आधारित असणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या शुभहस्ते सरस्वती पूजन, दीपप्रज्वलन आणि अबॅकस मण्यांच्या पाटीचे पूजन करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून पोलीस उपनिरीक्षक सविता काळे, पंचायत समिती सदस्य अमित जाधव, ,नगरसेवक अमित जाधव, प्राचार्या नीता खामकर, उपमुख्याध्यापिका जयश्री खणसे, महाराष्ट्र राज्य पत्रकार महासंघ शहराध्यक्ष निलेश काळे, बालभारती सदस्य स्वप्निल तांबे, भाजपा अध्यक्ष नितीन नलगे, संस्थापक अशोक कारले, अशोक घडेकर, अबॅकस नवसंशोधनातील जगातील पहिली पीएचडी प्राप्त डॉ. कल्पना घडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

१,४०० विद्यार्थ्यांतून कु. वेदीका शेजाळ हिने आपल्या उत्कृष्ट कामगिरीची छाप उमटवत 'चॅम्पियन ऑफ चॅम्पियन' हा मानाचा किताब पटकावला. तिच्या उल्लेखनीय यशाबद्दल तिला स्मृतिचिन्ह व सुमारे ३,००० चे रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

अहिल्यानगर, पारनेर, कर्जत, सोलापूर, श्रीगोंदा, काष्टी आदी विविध शहरांमधून आलेल्या सुमारे १,४०० विद्यार्थ्यांनी स्पर्धेत आपले

## अहिल्या सरस्वती महोत्सवात कर्तृत्ववानांचा गौरव पुरस्काराने सन्मान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** इतिहासातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यापासून ते आताच्या आधुनिक काळातील सर्वच महिला स्त्री शक्तीच्या आदर्श आहेत. समाजात स्त्री शक्तीप्रती कायम आदर व्यक्त व्हावा या संदेशासह नगरमध्ये अहिल्या सरस्वती महोत्सव घेण्यात आला.अहिल्यादेवींच्या लेकींचा आत्मविश्वास, दृढता, संस्कृती परंपराप्रती असलेली बांधिलकी आणि आधुनिक युगातील आव्हाने पेलण्याची क्षमता या महोत्सवात पहायला मिळाली.

सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल पुढाकाराने झालेल्या या अहिल्या सरस्वती महोत्सवात विविध क्षेत्रातील कर्तृत्ववानांचा सन्मान करण्यात आला. यात विचार भारती संस्थेला अहिल्या गौरव रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सुमन धामणे (आपली आजी) यांना अहिल्या प्रेरणा शक्ती पुरस्कार, महिला बस चालक सुनंदा सोनवणे यांना अहिल्या प्रेरणा शक्ती पुरस्कार, अमोल शिंदे यांना अहिल्या गोरव रत्न पुरस्कार, अविनाश देडगावकर यांना अहिल्या गोरव रत्न पुरस्कार, भूपाली निसळ यांना सरस्वती साहित्य रत्न पुरस्कार, गौरी कुलकर्णी यांना सरस्वती कला गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी ॲड. मोनिका पंकज आशिया, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, उपमहापौर धनंजय जाधव, डॉ. अमोल जाधव, डॉ . प्राजक्ता जाधव, मनपा स्थायी समितीच्या माजी सभापती सुवर्णा जाधव, दत्ता जाधव, संजय जाधव, टायटल स्पॉन्सर महावीर ग्रुपचे राजेश भंडारी, विचार भारतीचे राजाभाऊ मुळे, सुधीर लांडगे, रवींद्र बारस्कर, मनोज झंवर, संपतराव नलावडे, अनिल मोहिते, राहुल जामगावकर, अनिकेत कौर, श्रद्धा देडगावकर, अल्पना कासवा, मिनाताई सत्रे, मुंदडा, रचना काकडे, गुणाली मुथा आदी उपस्थित होते.

आयोजक डॉ.अमोल जाधव म्हणाले की, अहिल्या सरस्वती महोत्सव आयोजित करताना इतिहास, ज्ञान, कर्तृत्व, सक्षमीकरण आणि संस्कृती असा मिलाफ साधला. प्रत्येक कार्यक्रमातून महिला शक्तीची प्रचिती आली. महिलांना केवळ महिला म्हणून नाही तर एक व्यक्ती म्हणून सन्मान मिळायला हवा. विविध क्षेत्रात कर्तृत्व गाजवणाऱ्या महिला नव्या पिढीसाठी आदर्श आहेत. असे आदर्श आणखी निर्माण झाले पाहिजे या उद्देशाने हा विशेष सन्मान सोहळा झाला.

## एमआयडीसी पोलिस ठाण्यात विद्यार्थ्यांची चित्रकला स्पर्धा

**सात शाळांतील १५० विद्यार्थ्यांचा सहभाग; विजेत्यांचा बक्षिसे व प्रमाणपत्र देऊन गौरव**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या वतीने आयोजित चित्रकला स्पर्धेत परिसरातील सात शाळांमधील सुमारे १५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासोबतच पोलिसांच्या कार्याची माहिती मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

ढोरकिन येथील जिल्हा परिषद शाळा, जायकवाडी येथील जिल्हा परिषद शाळा, वाहेगाव येथील नागनाथ शाळा, जैन स्पिनर फाटा येथील भीमाशंकर शाळा, ढाकेफळ येथील तुकाराम हायस्कूल, ढोरकिन येथील आर्यनंदी पब्लिक स्कूल तसेच बालानगर येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला.



स्पर्धेतील प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना बक्षिसे व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना पोलिस ठाण्याची प्रत्यक्ष पाहणी करून देण्यात आली. तसेच पोलिसांकडील रायफलसह विविध साधनांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

पोलिस ठाण्याला भेट देऊन पोलिसांचे कामकाज जवळून पाहण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्येही मोठा उत्साह दिसून आला. या उपक्रमातून विद्यार्थी आणि पोलिसांमधील संवाद अधिक वाढण्यास मदत झाली.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### किशोर दांचा खट्याळपणा, मस्ती अन् तेच एक्सप्रेशन्स; कंचन नेहलानींच्या सादरीकरणाने रंगला मंच!

अहिल्यानगर - किशोर कुमार म्हटले की डोळ्यांसमोर उभा राहतो तो त्यांचा खट्याळपणा, मिश्कील हास्य, भन्नाट एक्सप्रेशन्स, अफलातून बॉडी लँग्वेज आणि आपल्या अभिनयातून प्रेक्षकांना खळखळून हसविण्याची अनोखी शैली.



हाच अंदाज हुबेहूब आपल्या अभिनयातून साकारत अहिल्यानगरच्या कंचन नेहलानी यांनी सलग दोन शानदार कार्यक्रमांमध्ये रसिकांची मने जिंकली. किशोर कुमार यांच्या व्यक्तिमत्त्वाची अनोखी झलक सादर केल्यामुळे त्यांना अहमदाबाद आणि कल्याण येथे विशेष सन्मानाने गौरविण्यात आले. किशोर कुमार यांच्या गाजलेल्या 'मेरे सामने वाली खिडकी' या लोकप्रिय गीतावर कंचन नेहलानी यांनी सादर केलेला अभिनय हा दोन्ही कार्यक्रमांचा विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. महिला कलाकाराने किशोर कुमार यांचा अंदाज, त्यांची मस्ती, त्यांचे हावभाव आणि खास देहबोली आत्मसात करून सादरीकरण करणे हीच या कार्यक्रमाची वेगळी ओळख ठरली. कंचन नेहलानी यांच्या या अनोख्या सादरीकरणाची सुरुवात अहमदाबाद येथे झालेल्या 'हॅप्पी फेस्ट' या कार्यक्रमातून झाली. मिस इंडिया कॉन्टिनेंटल सुमन चैलानी यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात कंचन यांनी 'मेरे सामने वाली खिडकी' या लोकप्रिय गीतावर किशोर कुमार यांच्या खास अंदाजात सादरीकरण केले.गीत सुरू होताच कंचन यांनी किशोर दांच्या शैलीतील देहबोली, चेहऱ्यावरील मिश्कील भाव आणि खट्याळ हालचाली सादर करत वातावरणात उत्साह निर्माण केला. त्यांच्या प्रत्येक हावभावाला आणि अभिनयातील बारकाव्यांना उपस्थित रसिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. किशोर कुमार यांच्या अभिनयशैलीचा केवळ बाह्य आविर्भाव न करता त्यातील विनोद, मस्ती आणि सहजपणा पकडण्याचा कंचन यांचा प्रयत्न विशेष भावला. अहमदाबादनंतर कल्याण येथे महाराष्ट्र राज्य सिंधी अकादमी आणि रोशनी कमल फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'तीज जश्न' या कार्यक्रमात कंचन नेहलानी यांनी पुन्हा एकदा आपल्या खास अंदाजाची झलक दाखविली.यावेळीही 'मेरे सामने वाली खिडकी' या गीताची निवड करण्यात आली. मात्र, यावेळी त्यांच्या सादरीकरणात किशोर दांचा तोच खट्याळपणा, तीच मस्ती आणि तेच मिश्कील एक्सप्रेशन्स अधिक प्रभावीपणे पाहायला मिळाले. त्यांच्या कॉमिक टाइमिंगमुळे आणि सहजसुंदर अभिनयामुळे कार्यक्रमस्थळी हास्याचे फवारे उडाले.कंचन यांच्या चेहऱ्यावरील हावभाव, हातवारे, चालण्याची ढब आणि बॉडी लँग्वेजमधून किशोर कुमार यांच्या व्यक्तिमत्त्वाची आठवण करून देणारे अनेक क्षण निर्माण झाले. त्यामुळे उपस्थित रसिकांनी टाळ्यांचा कडकडाट करत त्यांच्या सादरीकरणाला उत्स्फूर्त दाद दिली.

### गणेशाला डीजेचा दणदणाट नको; समाजाला ज्ञानाचा प्रकाश हवा!'



अहिल्यानगर - गणेशभक्तीच्या नावाखाली होणारा कर्णकर्कश डीजेचा दणदणाट, प्रचंड क्षमतेच्या ध्वनिवर्धक यंत्रणांचा वापर तसेच संस्कृतीच्या नावाखाली सार्वजनिक रस्ते व पदपथ अडविणाऱ्या मंडपांविरोधात पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांनी जनआंदोलनाची घोषणा केली आहे. गणेशोत्सवाला लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी दिलेल्या लोकजागृती, सामाजिक प्रबोधन आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या मूळ उद्देशाकडे पुन्हा नेण्यासाठी या दोन्ही संघटना लवकरच 'लोकमान्य राष्ट्रीय गणेशोत्सव आचारसंहिता २०२६' जाहीर करणार आहेत. या प्रस्तावित जनआचारसंहितेत गणेशोत्सवाच्या काळात डीजे, प्रचंड क्षमतेचे ध्वनिवर्धक तसेच वाहनांवर बसविलेल्या ध्वनिभिंतींना स्पष्टपणे नकार देण्यात येणार आहे. गणेशोत्सव हा भक्ती, सामाजिक प्रबोधन आणि लोकशिक्षणाचा उत्सव असावा; ध्वनीप्रदूषणाची स्पर्धा किंवा शक्तिप्रदर्शनाचे माध्यम होऊ नये, अशी भूमिका संघटनांनी मांडली आहे. सार्वजनिक रस्ते, पदपथ, चौक तसेच रुग्णवाहिका आणि अग्निशमन दलाच्या मार्गांवर मंडप, कमानी, व्यासपीठे किंवा जनरेटर उभारण्यासही संघटनांकडून विरोध केला जाणार आहे. उत्सवासाठी जागेचा वापर करायचा असल्यास नागरिकांची वाहतूक, आपत्कालीन सेवा आणि पादचाऱ्यांची सुरक्षितता यांना कोणत्याही परिस्थितीत बाधा येऊ नये, अशी मागणी करण्यात येणार आहे.

## श्री ढोकेश्वर महाविद्यालयातर्फे मंदिर परिसरात स्वच्छता अभियान



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री ढोकेश्वर कॉलेज, टाकळी ढोकेश्वर येथील राष्ट्रीय सेवा योजना (एन. एस.एस.) विभागाच्या वतीने श्री ढोकेश्वर मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी मंदिर परिसरात स्वच्छता करून परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा संदेश दिला. या अभियानात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत परिसरातील कचरा, प्लास्टिक व इतर अनावश्यक वस्तू गोळा करून परिसर स्वच्छ केला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची जाणीव, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. सार्वजनिक व धार्मिक स्थळांची स्वच्छता राखणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी असल्याचे यावेळी सांगण्यात आले. स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून 'स्वच्छ परिसर, सुंदर परिसर' हा संदेश देण्यात आला. एन.एस. एस. विभागाच्या या उपक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. वीरेंद्र धनशेट्टी , कार्यक्रम अधिकारी डॉ. विजय सुरोशी, कार्यक्रम अधिकारी प्रा. शुभांगी पवार, प्रा. साळवे गोरक्ष,

प्रा. श्रीकांत अल्हाट, डॉ. जिजाभाऊ घुले, डॉ. सुदाम वीर , प्रा. संतोष कोकाटे,प्रा .रोहिणी शिंदे, प्रा. ताई नऱ्हे ,प्रा. कोमल बर्डे, प्रा. जयश्री क्षीरसागर, प्रा. पूजा रोडे ,प्रा. जयश्री भोंडवे, प्रा. रमेश झावरे ,प्रा. स्नेहल वाळुंज, प्रा. साक्षी झावरे, प्रा.निशा थोपटे , प्रा. नीलम ,डॉ.वैशाली गंगोत्री, डॉ. एकनाथ जाधव, प्रा. महादेव जपकर, प्रा .अभिषेक फंड, प्रा. सोमनाथ चौधरी,

प्रा. संजय गायकवाड, श्री सुजित भोंवे, श्री मुरलीधर खाडे, श्री सुभाष बांडे, प्राध्यापक, शिक्षकेत्तर सेवक व एन.एस.एस. स्वंयसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संतोष गांधी यांच्या कार्याचा कायम अभिमान– राजेंद्र गांधी

### जैन ओसवाल समाज गौरव पुरस्काराबद्दल संतोष गांधी यांचा सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील गांधी परिवाराचे सदस्य विविध क्षेत्रात कार्यरत राहून उल्लेखनीय कार्य करत आहेत. आपापला व्यवसाय सांभाळून ते समाजासाठी भरीव कार्य करत असतात. संतोष गांधी हे आपल्या कुरिअर व्यवसायाचा मोठा व्याप सांभाळून अनेक वर्षांपासून सामाजिक, आर्थिक, राजकारण, धार्मिक क्षेत्रात योगदान देत आहेत. कोणाच्याही अडीअडचणीत धावून जाण्याचा त्यांचा स्वभाव आहे. एक हसतमुख आणि सर्वांना आपलेसे करणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या कार्याचा उचित सन्मान जैन ओसवाल समाज गौरव पुरस्काराने झाला आहे. संतोष गांधी यांचे कार्य सर्व गांधी परिवारांसाठी अभिमानास्पद आहे, असे प्रतिपादन राजेंद्र गांधी (आळेफाटावाला) यांनी केले.

गांधी कुरिअरचे संचालक संतोष गांधी यांचा नुकताच अहिल्या नगर येथील जैन ओसवाल युवक संघातर्फे (जॉईज) जैन ओसवाल समाज गौरव या पुरस्काराने सन्मान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल त्यांचा गांधी परिवारांच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी गांधी परिवाराचे सदस्य उपस्थित होते.

संतोष गांधी म्हणाले की, दिनदुबळ्यांची सेवा आणि गरजूंना मदत करण्याची आचार्य श्रींची शिकवण आचरणात आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत असतो. प्रत्येकाने समाज ऋणातून उतराई होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. सामाजिक, धार्मिक, अर्थकारण, राजकीय क्षेत्रात काम करताना नेहमीच सकल गांधी परिवाराच्या सदिच्छा व प्रोत्साहन लाभत असते. हा पुरस्कार माझ्या एकट्याचा नसून मला प्रोत्साहन देणाऱ्या सर्वांचा आहे. गांधी परिवारांनी केलेला सन्मान आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा देणारा आहे.

## गणेशोत्सवात महिलांची कुचंबणा टाळण्यासाठी अहिल्यानगरात फिरती स्वच्छतागृहे उभारा!

### माजी नगरसेवक संजय झिंजे यांची महापौरांकडे मागणी; प्रमुख गणेश मंडळे व विसर्जनस्थळी सुविधा देण्याचे आवाहन । गणेशोत्सवापूर्वी मनपाने ठोस नियोजन करावे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गणेशोत्सवाच्या काळात अहिल्यानगर शहरात विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने महिलांसाठी पुरेशी सार्वजनिक स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी माजी नगरसेवक संजय झिंजे यांनी महापौरांकडे निवेदनाद्वारे केली आहे. शहरातील प्रमुख गणेश मंडळांजवळ तसेच विसर्जनस्थळी महानगरपालिकेच्या वतीने फिरत्या स्वच्छतागृहांची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.



अहिल्यानगर शहरात लवकरच सार्वजनिक गणेशोत्सवाला सुरुवात होणार असून, शहरातील विविध गणेश मंडळांनी उत्सवाची तयारी सुरू केली आहे. गणेशोत्सवाच्या काळात शहरातील आकर्षक देखावे पाहण्यासाठी तसेच गणेश विसर्जनाच्या मिरवणुका पाहण्यासाठी अहिल्यानगर शहरासह ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने नागरिक शहरात दाखल होतात. यामध्ये महिला व मुलींची संख्याही मोठी असते.

मात्र, शहरातील अनेक भागांत महिलांसाठी पुरेशा सार्वजनिक स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध नसल्याने महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. गणेशोत्सवासारख्या मोठ्या उत्सवाच्या काळात ही समस्या आणखी गंभीर होण्याची शक्यता असल्याने महापालिका प्रशासनाने आतापासूनच आवश्यक नियोजन करावे, अशी मागणी झिंजे यांनी केली आहे.

अहिल्यानगर शहरातील बाजारपेठा, प्रमुख चौक आणि गर्दीच्या भागांमध्ये विविध कामांसाठी मोठ्या संख्येने महिला येत असतात. मात्र, सार्वजनिक स्वच्छतागृहांची संख्या अपुरी असल्यामुळे महिलांना अनेकदा गैरसोयीचा सामना करावा लागतो. गणेशोत्सवाच्या काळात शहरात नागरिकांची गर्दी अनेक पटींनी वाढते. त्यामुळे महिलांसाठी स्वच्छतागृहांचा प्रश्न अधिक गंभीर बनतो. गणेशोत्सवातील देखावे पाहण्यासाठी शहरात येणाऱ्या महिला तसेच विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी येणाऱ्या कुटुंबांना मूलभूत सुविधा मिळणे आवश्यक आहे. स्वच्छतागृहासारखी अत्यावश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने महिलांची कुचंबणा होणे ही गंभीर बाब आहे, असे झिंजे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

यावर्षीच्या गणेशोत्सवाच्या काळात शहरातील प्रमुख गणेश मंडळांच्या परिसरात महानगरपालिकेने फिरती स्वच्छतागृहे उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. केवळ स्वच्छतागृह उभारून न थांबता त्याठिकाणी पुरेशा प्रमाणात पाण्याची व्यवस्था करावी. तसेच स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता आणि देखभाल करण्यासाठी महानगरपालिकेचे कर्मचारी नियुक्त करावेत, अशीही मागणी झिंजे यांनी केली आहे.

गणेशोत्सवाच्या काळात स्वच्छतेचा प्रश्न निर्माण होऊ नये आणि नागरिकांना आरोग्याच्या दृष्टीने सुरक्षित वातावरण मिळावे, यासाठी स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गणेश विसर्जनाच्या दिवशी शहरातील विविध विसर्जन विहिरी आणि संबंधित ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होते. या दिवशी महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि कुटुंबांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित असतात. त्यामुळे विसर्जन विहिरी असलेल्या ठिकाणीही फिरती स्वच्छतागृहे उभारावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

विसर्जनाच्या दिवशी वाढणारी गर्दी लक्षात घेऊन स्वच्छता, पाणी, प्रकाशयोजना, वाहतूक आणि नागरिकांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा यांचे योग्य नियोजन महापालिकेने करावे, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे. नुकत्याच झालेल्या शांतता समिती आणि गणेशोत्सव मंडळांच्या बैठकीत आपण महिलांसाठी स्वच्छतागृहांची आवश्यकता प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली असल्याचे संजय झिंजे यांनी निवेदनात नमूद केले आहे. गणेशोत्सव हा सर्व समाजघटकांचा उत्सव असून, या काळात शहरात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही स्थानिक प्रशासनाची जबाबदारी आहे. विशेषतः महिलांसाठी स्वच्छतागृह ही सुविधा केवळ उत्सवापुरती मर्यादित न राहता शहराच्या विविध भागांत कायमस्वरूपी उपलब्ध असणे आवश्यक आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

## सार्वजनिक उत्सवांमध्ये जल्लोष करण्यासाठी डीजे डॉल्बी सिस्टीम ऐवजी ब्लूटूथ हेडफोनचा वापर व्हावा : मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सार्वजनिक उत्सव मिरवणुकांमध्ये जल्लोष करण्यासाठी डीजे ध्वनीक्षेपकांऐवजी ब्लूटूथ हेडफोन, वायरलेस एअर बडस् असे अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित पर्सनल ऑडिओ डिवाइस वापरण्यात यावेत, या नाविन्यपूर्ण व शांततापूर्ण उत्सव संकल्पनेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी हरिभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय ललवाणी यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात श्री ललवाणी यांनी म्हटले आहे की,आपले महाराष्ट्र राज्य हे सण, उत्सव व धार्मिक परंपरा असलेले राज्य आहे. विविध सार्वजनिक उत्सव व सणानिमित्त नागरिक मोठ्या उत्साहाने एकत्र येतात. मात्र अलीकडील काळात सार्वजनिक उत्सव मिरवणुकांमध्ये कार्यकर्ते जल्लोष करण्यासाठी मोठ्या कर्कश्य व असह्य आवाजाचे डीजे डॉल्बी ध्वनिक्षेपक वापरतात. या कर्कश आवाजातून सहभागी कार्यकर्त्यांना आनंद व उत्साह मिळत असला तरी नजीकच्या ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, रुग्ण व इतर नागरिकांना या कर्कश ध्वनी प्रदूषणाचा मोठा त्रास सहन करावा लागतो. असह्य आवाजामुळे अनेकदा जीवित हानी झालेली आहे.

या सर्व बाबींचा विचार करता ब्लूटूथ हेडफोन वायरलेस - इयर बडस् व पर्सनल ऑडिओ डिवाइस हा अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शांततापूर्ण उत्सव साजरा करण्यासाठी उत्तम पर्याय ठरू शकतो, असे निवेदनात म्हटले आहे.

## केडगावात साई सच्चरित्र पारायण सोहळ्याची भक्तिमय वातावरणात सांगता

### साईच्या विचारांनी मनाला शांती व सकारात्मक ऊर्जा मिळते; साईकथाकार माधुरीताई शिंदे यांचे प्रतिपादन । शाहूनगर परिसरातून निघालेल्या साई पालखी मिरवणुकीने वेधले भाविकांचे लक्ष

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** धार्मिक कार्यातून मनाला मानसिक समाधान आणि सकारात्मक ऊर्जा मिळते, तेथेच परमेश्वराचे अस्तित्व अनुभवायला मिळते. नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने माणूस आपल्या गावापासून दूर जातो. मात्र नवीन ठिकाणी मंदिराची उभारणी करून सर्वांना एकत्र आणण्याचे कार्य ही भारतीय संस्कृतीची मोठी ताकद आहे. भारतीय संस्कृतीने देवाचे स्वरूप निसर्गाशी जोडले असून, अध्यात्मामुळे मन प्रसन्न होते आणि नकारात्मक विचार दूर होतात, असे प्रतिपादन साईकथाकार माधुरीताई शिंदे यांनी केले.

केडगाव येथील बँक कॉलनी परिसरातील श्री साईबाबा फाऊंडेशनच्या साईबाबा मंदिराच्या तेराव्या स्थापना दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त मंदिर परिसरात साई सच्चरित्र ग्रंथ पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यास केडगाव परिसरातील साईभक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

साईबाबांनी मानवतेला प्रेम, श्रद्धा, सबुरी आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश दिला.सबका मालिक एक या विचारातून त्यांनी जात, धर्म, पंथ यापलीकडे जाऊन माणुसकीला सर्वोच्च स्थान दिले. गरजूंची सेवा करणे, दुःखी व्यक्तीला आधार देणे आणि प्रत्येक जीवामध्ये परमेश्वर पाहणे, हा साईंच्या शिकवणीचा मुख्य गाभा आहे. साईचरित्राचे वाचन व श्रवण केल्याने मनाला समाधान मिळते, श्रद्धा दृढ होते आणि जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याची प्रेरणा मिळते,



असे माधुरीताई शिंदे यांनी आपल्या प्रवचनातून सांगितले.

यंदा पावसाने दडी मारल्याने शेतकरी आणि नागरिक चिंतेत आहेत. त्यामुळे साई सच्चरित्र पारायणाच्या माध्यमातून चांगला पाऊस पडावा, सर्वत्र सुख-समृद्धी नांदावी आणि सर्वांचे जीवन आनंदी व्हावे, अशी प्रार्थनाही साईचरणी करण्यात आली.

प्रारंभी शाहूनगर परिसरातून साईबाबांच्या पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. पालखी दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. टाळ-मृदंगाचा गजर, साईनामाचा जयघोष आणि भक्तिमय वातावरणामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. साईभक्तांनी मिरवणुकीत उत्स्फूर्त सहभाग घेतला.

मध्यान आरती नगरसेवक अमोल येवले, नगरसेविका वर्षा काकडे यांच्या हस्ते करण्यात आली.काकड आरती दिलीपशेठ नागरे यांच्या हस्ते, तर सकाळची आरती अशोकराव सोनार यांच्या हस्ते करण्यात आली. साईकथाकार माधुरीताई शिंदे यांच्या प्रवचनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. साई सच्चरित्र ग्रंथ पारायणाच्या समारोपप्रसंगी साईंची धुपारती उद्योजक राजेश जग्गी व जयद्रथ खाकाळ यांच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाने सोहळ्याची भक्तिमय वातावरणात सांगता झाली.

यावेळी फाऊंडेशनचे सदस्य डॉ. मुकुंद शेवंगावकर, प्रकाश वाघ, अशोक झिने, अजितसिंग दडियाल, चंद्रशेखर मलिकपेटकर, बाळासाहेब देशमुख, रविंद्र देशपांडे,अजित कातोरे,अशोक जाधव, कावेरी जाधव, दडियाल भाभी, प्रकाश चांदेकर, संजय बोरगे, श्री. टेके गुरुजी, गायकवाड, योगेश गुंजाळ, पुरुषोत्तम भूकन,विनायक कावरे,मारुती रवीद्र भिडे,चव्हाण, वैद्य मॅडम, रमेश शहाणे,किर्ती नवले, इंदुमती सातपुते, व्यासपीठ वाचक श्रीनिवास सहदेव यांच्यासह परिसरातील साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक झिने यांनी केले. संपूर्ण सोहळ्यादरम्यान केडगाव परिसरात भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

## जुन्या पेन्शनसाठी शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा एल्गार; काळ्या फितीने आंदोलनाला सुरुवात

### जुन्या पेन्शनच्या मागणीसाठी शिक्षक आक्रमक; ५ सप्टेंबरला शिक्षक दिनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे । २८ सप्टेंबरपासून मुंबईत सहकुटुंब आंदोलनाचा इशारा; 'जुनी पेन्शन द्या, अन्यथा आंदोलन तीव्र'चा शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा इशारा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जुन्या पेन्शन योजनेपासून वंचित ठेवण्यात आल्याच्या निषेधार्थ राज्यातील माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचे रणशिंग फुंकले आहे. मंगळवारपासून (ता. १ सप्टेंबर) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती बांधून शासनाच्या धोरणाचा निषेध नोंदविण्यास सुरुवात केली आहे. १ ते ४ सप्टेंबर या कालावधीत काळ्या फिती बांधून नियमित शैक्षणिक कामकाज सुरू ठेवत हे आंदोलन करण्यात येणार आहे.

यानंतर शिक्षक दिनाचे औचित्य साधून ५ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. जुन्या पेन्शन योजनेच्या मागणीबाबत शासनाने अद्याप ठोस निर्णय घेतला नसल्याने आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शासनाने मागणीची दखल घेऊन सकारात्मक निर्णय न घेतल्यास २८ सप्टेंबरपासून मुंबईतील आझाद मैदानावर सहकुटुंब आंदोलन छेडण्यात येईल, तसेच आमरण उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. जुनी पेन्शन कोअर कमिटीचे राज्य सचिव तथा जुन्या पेन्शन योजना समन्वय संघाचे राज्य समन्वयक महेंद्र हिंगे आणि राज्य समन्वयक सुनील भोर यांनी ही माहिती दिली.



१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुन्या पेन्शन योजनेचा लाभ मिळावा, ही मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. जुन्या पेन्शन योजनेचा लाभ मिळावा यासाठी संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यापूर्वीही विविध आंदोलने, निवेदने आणि मोर्चांच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, वारंवार आंदोलने करूनही शासनाकडून या प्रश्नावर ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही, असा आरोप जुन्या पेन्शन योजना समन्वय संघाने केला आहे. त्यामुळे आता आंदोलनाचा टप्पा अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात १ ते ४ सप्टेंबरदरम्यान शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी काळ्या फिती बांधून शाळांमध्ये नियमित शैक्षणिक कामकाज पार पाडणार आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, याची काळजी घेत शासनाच्या धोरणाचा निषेध करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. काळ्या फिती हे शासनाच्या धोरणाविरोधातील निषेधाचे प्रतीक म्हणून वापरण्यात येणार असून, या माध्यमातून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागणीकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

आंदोलनाच्या पुढील टप्प्यात ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनाच्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. शिक्षकांचा सन्मान करण्याचा दिवस असतानाच आपल्या न्याय्य हक्कासाठी शिक्षकांना आंदोलन करावे लागत असल्याची खंत आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली आहे. या धरणे आंदोलनात जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मानसी डान्स स्टुडिओतर्फे श्रावणात मंगळागौर उत्सव उत्साहात

# पारंपरिक गाणी, नृत्य व खेळांनी महिलांनी जपली संस्कृतीची परंपरा




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मानसी डान्स स्टुडिओच्या वतीने श्रावण महिन्यानिमित्त २४ ते ३१ ऑगस्टदरम्यान आयोजित करण्यात आलेल्या मंगळागौर शिबिराची सांगता पारंपरिक मंगळागौर गाणी, नृत्ये आणि खेळांच्या उत्साहपूर्ण सादरीकरणाने झाली. माऊली सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात प्रशिक्षण घेतलेल्या २९ महिलांनी विविध पारंपरिक मंगळागौर गाणी व खेळांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमास गुरुवर्या सुरेखा डावरे, उपअधीक्षक भूमी अभिलेख अविनाश मिसाळ, ज्येष्ठ पत्रकार श्रीराम जोशी, प्राचार्य शाम गणवीर, डॉ. दमन काशीद, डॉ. गायत्री कुलकर्णी, उपप्राचार्य सुवर्णा गणवीर, इंजि. सुनील बोरुडे, डॉ. मधुकर काळे, तेजस्विनी भानुदास आहेर, अर्चना शिंदे, उद्योजक संतोष शिंदे, इंजि. केतन देठे, अर्जुन वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते.

मंगळागौर उत्सवातील सहभागी महिलांनी सुप्रसिद्ध तबला व ढोलकीवादक मास्टर गुलाब नेटके यांच्या ढोलकीच्या ठेक्यावर 'नाच गं घुमा', 'किस बाई किस', 'धपोरी घाल पोरी', 'कुरकुली', 'आगोटा पागोटा', 'तांदूळ सडू', 'आवळा वेचू' आदी पारंपरिक गाणी व खेळांचे सादरीकरण केले. पारंपरिक वेशभूषा, उत्साहपूर्ण नृत्य आणि लयबद्ध ठेक्यामुळे संपूर्ण सभागृहात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

मंगळागौर उत्सव टीममधील साधना घोडके, सीमा देशमुख, मीना कटारनवरे, कल्पना कांबळे तसेच व्यवस्थापक मंडळातील इंजि. संजीव घोडके, डॉ. शैलेंद्र खंडागळे, बाळासाहेब शिंदे, विक्रम देशमुख, हर्ष गायकवाड व हर्षित भिंगारदिवे यांनी उपस्थित मान्यवरांचा सत्कार केला. यावेळी सुप्रसिद्ध राष्ट्रीय तबला व ढोलकीवादक मास्टर गुलाब नेटके यांना विशेष सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

गुरुवर्या सुरेखा डावरे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, मानसी डान्स स्टुडिओने गेल्या चार वर्षांपासून सातत्याने मंगळागौर शिबिराच्या माध्यमातून पारंपरिक संस्कृती जपण्याचा प्रयत्न केला आहे. बदलत्या काळात विस्मरणात जात असलेल्या परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असून, संस्कृती आणि पर्यावरणपूरक उत्सव यांचा सुंदर संगम या उपक्रमातून साधला जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

# दुष्काळ सदृश्य परिस्थितीतही भगवानगडाची विहीर तुडुंब भरली

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

(छाया– सतिष जगताप )



**खरवंडी कासार–** श्री क्षेत्र भगवानगडाच्या पायथ्याशी नागलवाडी-बोधेगाव रस्त्यालगत डोंगराच्या कुशीत भगवानगडाच्या शेतजमिनीला लागून असलेली एक विहीर सध्या परिसराचे लक्ष वेधून घेत आहे. गेल्या दोन महिन्यांपासून पावसाने दडी मारल्याने परिसरात दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. तलाव, बंधारे तसेच अनेक विहिरींची पाणीपातळी दिवसेंदिवस खालावत असताना या विहिरीची पाणीपातळी मात्र कमी होण्याऐवजी कायम राहून वाढत असल्याची माहिती परिसरातील शेतकऱ्यांनी दिली.

भगवानगडावर संत ज्ञानेश्वर माऊली मंदिराचे बांधकाम अत्यंत वेगाने सुरू आहे. तसेच येथे अखंडपणे अन्नदान सुरू असून भाविकांना पिण्यासाठी तसेच गडावरील गोशाळेतील गोधनासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते. या सर्व कामांसाठी याच विहिरीतील पाण्याचा वापर केला जात आहे. सातत्याने पाण्याचा उपसा होत असतानाही विहिरीतील पाण्याची पातळी टिकून असून, उलट ती वाढत असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. त्यामुळे ही विहीर सध्या परिसरात चर्चेचा विषय बनली आहे.

या विहिरीतील पाणीपातळी वाढल्याची माहिती सोशल मीडियावर तसेच परिसरात पसरताच अनेक नागरिकांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. एकीकडे पावसाने पाठ फिरवल्याने परिसरातील जलस्रोत आटत आहेत, तर खरिपातील पिके पुरेशा पावसाअभावी जळून चालली आहेत. मात्र, डोंगराच्या कुशीत असलेल्या या विहिरीत मुबलक पाणीसाठा कायम टिकून आहे.

त्यामुळे ही भगवानगडाला निसर्गाची अनोखी साथ असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे. विशेष म्हणजे या विहिरीपासून अवघ्या दीडशे फुटांवर नागलवाडी येथील एक खासगी विहीर आहे. मात्र, या विहिरीतील पाणीसाठा अत्यल्प असून ती जवळपास कोरडी ठाक झाली आहे. एकाच परिसरात आणि अवघ्या दीडशे फुटांच्या अंतरावर असलेल्या दोन विहिरींच्या पाणीपातळीत एवढी मोठी तफावत असल्याने हा विषय सध्या परिसरात कुतूहलाचा ठरला आहे.

भगवानगडावर संत ज्ञानेश्वर माऊली मंदिराचे बांधकाम, दररोज सुरू असलेले अन्नदान तसेच गोशाळेतील गोधनासाठी सातत्याने पाण्याचा वापर होत असतानाही या विहिरीतील पाणीसाठा कमी होत नसल्याने भाविकांमध्येही आश्चर्य व्यक्त होत आहे. भगवानगडाचे संत भगवानबाबांशी असलेले आध्यात्मिक नाते सर्वश्रुत आहे. संत भगवानबाबांनी पाण्यावर गाथा वाचन केल्याची परंपराही सांगितली जाते. त्यामुळे या परिसरातील विहिरीत पाणी टिकून राहणे ही संत भगवानबाबांची कृपा आणि निसर्गाची साथ असल्याची भावना अनेक भाविकांकडून व्यक्त केली जात आहे. जलस्रोताचा शास्त्रीय अभ्यास होण्याची गरज या विहिरीला पाण्याचा नैसर्गिक स्रोत नेमका कोणता आहे, याचा शास्त्रीयदृष्ट्या अभ्यास झाल्यास पाणीपातळी कायम राहण्यामागील कारण स्पष्ट होऊ शकते. सध्याच्या दुष्काळजन्य परिस्थितीत परिसरातील जलस्रोतांची पाणीपातळी खालावत असताना भगवानगडाच्या पायथ्याशी असलेली ही विहीर मात्र तुडुंब आहे. पावसाची प्रतीक्षा असतानाही या विहिरीने भगवानगडावरील ज्ञानेश्वर मंदिराचे बांधकाम, दररोजचे अन्नदान आणि गोशाळेतील गोधनासाठी पाण्याचा मोठा आधार दिला आहे. त्यामुळे या विहिरीची निसर्गाची साथ सध्या नागलवाडी परिसरात चर्चेचा विषय ठरली आहे. संत भगवानबाबांनी सुरू केलेल्या वारकरी संप्रदायाची पताका भगवानगड परिसरात अखंडपणे सुरू आहे. गडाच्या विकासासाठी परिसरातील नागरिकही आपल्या परीने हातभार लावत आहेत. साधुसंतांच्या कृपेने भगवानगडावर कोणतीच गोष्ट कमी पडत नाही, अशी भावना भगवानगड परिसरातील भाविक व्यक्त करत आहेत.

# श्रीराम मंदिरात ५ सप्टेंबरला गणपती मूर्तीची प्राणप्रतिष्ठा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बुरुडगाव रोड, चौरे मळा, श्रीराम नगर येथील श्रीराम मंदिरात गणपती बाप्पाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा सोहळा शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२६ रोजी भक्तिमय वातावरणात आयोजित करण्यात आला आहे. परिसरातील नागरिकांनी एकत्र येऊन धार्मिक श्रद्धा, सामाजिक एकोपा आणि बंधुभाव जपण्याच्या उद्देशाने या सोहळ्याचे आयोजन केले आहे.

गणपती मूर्तीची प्राणप्रतिष्ठा दुपारी १२ वाजता होणार असून, त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. महाप्रसादाची वेळ दुपारी ४ ते रात्री ८ वाजेपर्यंत आहे. या सोहळ्यानिमित्त परिसरातील नागरिक, महिला, युवक आणि गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री गणरायाचे दर्शन घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता समाजातील विविध घटकांना एकत्र आणणारा आणि सामाजिक सलोखा दृढ करणारा उत्सव आहे. या पार्श्वभूमीवर श्रीराम मंदिरातील प्राणप्रतिष्ठा सोहळ्यातून परिसरात भक्तीबरोबरच सामाजिक एकात्मतेचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. विशेष सहकार्य श्रीमती सुरेखाताई नंदकुमार चौरे यांचे लाभले आहे.

या मंगलमय सोहळ्यास सर्वांनी उपस्थित राहून श्री गणरायाच्या कृपेचा लाभ घ्यावा, तसेच महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ॲड. बाळासाहेब मेहेत्रे व श्रीराम भक्त सेवा मंडळ, श्रीराम नगर, अहिल्यानगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अहोरात्र जनतेच्या सुरक्षेसाठी धावणाऱ्या पोलिसांच्या पाठीवर कौतुकाची थाप

### स्नेहबंधतर्फे पदकविजेत्यांचा सत्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** ऊन, पाऊस, सण-उत्सव कशाचीही तमा न बाळगता समाजाच्या सुरक्षेसाठी २४ तास डोळ्यात तेल घालून पहारा देणाऱ्या खाकी वर्दीतील कर्तव्यनिष्ठेला अखेर राष्ट्रीय स्तरावर दाद मिळाली आहे. अहिल्यानगर पोलीस दलातील कर्तव्यदक्ष अधिकारी व अंमलदारांना राष्ट्रपती पोलीस पदक, अति-उत्कृष्ट व उत्कृष्ट सेवा पदक जाहीर झाल्याच्या पार्श्वभूमीवर स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या हस्ते हा गौरव सोहळा पार पडला.

पोलीस मुख्यालयातील स.पो. उपनिरीक्षक अन्वरअली सय्यदअली सय्यद यांच्या प्रदीर्घ आणि निष्कलंक सेवेची दखल घेत त्यांना मानाचे राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर झाले आहे. तर गुन्हेगारी नियंत्रण आणि तपासात आघाडीवर राहिलेले सपोनि हेमंत थोरात यांना अति-उत्कृष्ट सेवा पदक मिळाले.

सपोउपनिरीक्षक किरण शेलुकर, पोलीस हवालदार : रंगनाथ नरसाळे, राजू सुद्रिक, सुरेश माळी, संतोष ओहळ, सुयोग सुपेकर, अभिजीत अरकल, सचिन जाधव, कृष्णा विधाटे महिला पोलीस हवालदार : माधुरी तोडमल, भाग्यश्री भिटे, कीर्ती कांजवणे यांना उत्कृष्ट सेवा पदक जाहीर झाल्याबद्दल गौरविण्यात आले. खाकी वर्दीतील या उल्लेखनीय सेवेला समाजात प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

खाकीच्या त्यागाची राष्ट्रीय पातळीवर दखल

''पोलीस कर्मचारी कुटुंबाचा विचार न करता समाजासाठी झटतात. त्यांच्या गुणवत्तेला मिळालेली ही पदके म्हणजे नगर जिल्ह्याचा अभिमान आहे. कर्तव्यावर असलेल्या प्रामाणिक हातांचा सन्मान करून समाजासमोर त्यांचा आदर्श ठेवणे हेच आमचे कर्तव्य आहे.''

डॉ. उद्धव शिंदे, संस्थापक अध्यक्ष, स्नेहबंध सोशल फौंडेशन

# संत भगवान बाबांनी सर्वसामान्यांना जीवन जगण्याचा मार्ग दाखवला – हभप बाबासाहेब बडे



(छाया– सतिष जगताप )

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार–** अंधश्रद्धा निर्मूलन आणि शिक्षणाची गंगा घरोघरी पोहोचवणारे राष्ट्रसंत भगवानबाबा बहुजनांच्या उद्धाराचा ज्ञानोबा–तुकोबां'च्या वारकरी विचारांचा वारसा पुढे चालवत, समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ट चालीरीतींवर प्रहार करणारे आणि शिक्षणाची दारे खुली करणारे राष्ट्रसंत भगवानबाबा यांनी सर्वसामान्यांना खऱ्या अर्थाने जीवन जगण्याचा नवा मार्ग दाखवला आहे.

केवळ अध्यात्म नव्हे, तर शेतकऱ्यांच्या आणि कष्टकऱ्यांच्या मुलांनी शिकलं पाहिजे हा विचार घेऊन त्यांनी केलेले कार्य आजही लाखो लोकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. अंधश्रद्धा आणि अनिष्ट रूढींवर प्रहारभगवानबाबांनी आपल्या कीर्तनाच्या आणि प्रवचनाच्या माध्यमातून समाजातील अंधश्रद्धा, जातीभेद आणि अनिष्ट रूढी-परंपरांवर तीव्र प्रहार केला. ''देव दगडात नसून माणसात आहे.

माणसाची सेवा हीच खरी ईश्वर सेवा'' हा संदेश त्यांनी दिला. व्यसनमुक्ती, हुंडाबंदी आणि शैक्षणिक क्रांतीची सुरुवात बाबांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे त्यांनी ग्रामीण आणि दुर्गम भागात सुरू केलेले शिक्षण कार्य गोरगरीब, वंचित आणि ऊसतोड कामगारांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत, म्हणून त्यांनी अनेक ठिकाणी शिक्षण संस्था, शाळा आणि वसतिगृहांची स्थापना केली.

''हातात टाळ आणि खांद्यावर शिक्षणाची पताका'' घेऊन बहुजनांच्या मुलांसाठी शिक्षणाची गंगा दारात आणली बाबांनी सर्वसामान्यांना दाखवला सन्मानाचा मार्ग त्या काळी शिक्षणाअभावी दिशाहीन झालेल्या समाजाला बाबांनी स्वाभिमानाने जगण्याचा मार्ग दाखवला. शेती सुधारणा, जलसंधारण आणि श्रमदानाचे महत्त्व त्यांनी लोकांना पटवून दिले. भगवानगड या पवित्र भूमीवरून त्यांनी सुरू केलेले हे सामाजिक कार्य आजही अविरतपणे सुरू आहे. थोडक्यात सांगायचे तर, संत भगवानबाबा हे केवळ एक धार्मिक संत नव्हते, तर ते समाजसुधारक आणि महान शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांच्या या महान कार्यामुळेच ते आज युगायुगांचे राष्ट्रसंत म्हणून जनमानसात अजरामर आहे असे मत हभप बाबासाहेब महाराज बडे (श्रीक्षेत्र केशवराज संस्थाण वारणी) यांनी व्यक्त केले ते जवरेवस्ती येथे जयभगवान युवा प्रतिष्ठाण आयोजित श्री संत भगवानबाबा जयंती सोहळ्याप्रसंगी किर्तण सेवेत बोलत होते काय सांगू संताचे उपकार सांगावे तेवढे कमी आहेत चांगले शिक्षण संस्कार अवगत करा आई वडीलांची समाजाची सेवा करा आयुष्यात काही कमी पडणार नाही असे मत व्यक्त केले श्रीक्षेत्र भगवान गडाचे महंत हभप डॉ. नामदेवशास्त्री यांच्या मार्गदर्शना खाली दरवर्षी जयभगवान युवा प्रतिष्ठाण वतीने श्रीसंत भगवानबाबा पुण्यतीथी सोहळा आयोजित असतो दिवसेन दिवस पुण्यतीथी सोहळ्याच आकर्षक बदल प्रगती होत आहे.

जयभगवान युवा प्रतिष्ठाण अध्यक्ष अनिल जवरे यांच्या हस्ते श्रीसंत भगवानबाबा यांच्या मुर्तीचा जलाभिषेक संपन्न तर महाप्रसाद अन्नदाते अशोक बाबासाहेब खेडकर यांच्यावतीन महंताचा सन्मान करण्यात आला यावेळी कार्यक्रम संपन्न ते साठी जवरेवस्ती ग्रामस्थ तथा जयभगवान युवा प्रतिष्ठान सदस्य लक्ष्मण खेडकर मल्हारी खेरकर गणेश खेडकर लक्ष्मण जवरे अशोक खेडकर पांडुरंग जवरे अंकुश जवरे सचिन खेडकर अक्षय खेडकर वैजनाथ जवरे ज्ञानेश्वर जवरे राहुल जवरे प्रसाद जवरे राम खेडकर आजिनाथ खेडकर गौतम खेडकर देविदास धावड आजिनाथ धावड सुनील जवरे विनायक खेडकर अशोक जवरे कालिदास जवरे गणेश जवरे मनोज खेडकर अमोल खेडकर माणिक जवरे विठ्ठल खेडकर पांडुरंग खेडकर छोटू खेडकर राजेंद्र बडे महाप्रसादाचे अन्नदाते अशोक बाबासाहेब खेडकर आयोजक जय भगवान युवा प्रतिष्ठान जवरे वस्ती यांनी परिश्रम घेतले महाप्रसादात शिंगोरी आमटी असल्याने रंगत आली जयभगवान युवा प्रतिष्ठाणचे सचिव सुनिल जवरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# वाळू वाहतूकदाराकडून हजाराची लाच घेताना बिडकीन पोलिसाचा अंमलदार रंगेहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** वाळू वाहतूकदाराकडून एक हजार रुपयांची लाच स्वीकारताना बिडकीन पोलीस ठाण्यातील पोलीस अंमलदाराला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने पैठण शहरातील सह्याद्री चौकात रंगेहात पकडले. बुधवारी सायंकाळी झालेल्या या कारवाईमुळे पोलीस विभागात खळबळ उडाली. वाळू वाहतुकीसंदर्भात कारवाई न करण्याच्या मोबदल्यात संबंधित पोलीस अंमलदाराने तक्रारदाराकडे एक हजार रुपयांची लाच मागितल्याचे समोर आले. याबाबत तक्रारदाराने एसीबीकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबीच्या पथकाने सह्याद्री चौक परिसरात सापळा रचला. ठरल्याप्रमाणे तक्रारदाराकडून एक हजार रुपयांची लाच स्वीकारताच एसीबीच्या पथकाने संबंधित पोलीस अंमलदाराला रंगेहात ताब्यात घेतले. या प्रकरणी पुढील कायदेशीर कारवाई सुरू असून, एसीबीकडून तपास केला जात आहे. वाळू वाहतुकीवर कारवाई करण्याची जबाबदारी असलेल्या पोलिसावरच लाच स्वीकारल्याप्रकरणी कारवाई झाल्याने बिडकीन पोलीस ठाण्यातील कारभाराबाबत चर्चेला उधाण आले आहे.

# कोळपेवाडीत सर्वधर्मसमभावाचा वारसा; मुस्लिम कुटुंबाकडून सप्ताहात पंगत;पठाण कुटुंबाचे कौतुक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**कोपरगाव–** धार्मिक उत्सव केवळ श्रद्धेपुरते मर्यादित न राहता त्यातून एकता, बंधुभाव आणि माणुसकीचा संदेश समाजापर्यंत पोहोचला पाहिजे, याचे सुंदर उदाहरण कोळपेवाडीने पुन्हा एकदा घालून दिले आहे. गावात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह तथा ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला यंदा एक ऐतिहासिक आणि सामाजिक सलोखा जपणारी घटना जोडत तब्बल ३३ वर्षांच्या सप्ताहाच्या इतिहासात प्रथमच मुस्लिम कुटुंबाकडून भाविकांसाठी पंगतीचे आयोजन करण्यात आले आहे. कोळपेवाडीची ओळख ही केवळ धार्मिक परंपरा जपणाऱ्या गावाची नाही,तर सामाजिक सलोखा जपणारे आणि सर्वधर्मीयांना सोबत घेऊन चालणारे गाव म्हणूनही आहे. याच विचारांची प्रचिती आजच्या पंगतीच्या माध्यमातून पुन्हा एकदा आली आहे.

धर्म वेगळे असले तरी माणुसकीची भावना एकच असते, हा संदेश देत पठाण सायकल मार्ट चे संचालक शेरखान दलीलखान पठाण, हलिमा शेरखान पठाण, सलीम पठाण व फिरोजखा पठाण या मुस्लिम कुटुंबाच्या वतीने बुधवार रोजी सप्ताहातील भाविकांसाठी अन्नदानाची पंगत आयोजित आली होती.३३ वर्षांच्या या परंपरेत पहिल्यांदाच घडलेला हा प्रसंग कोळपेवाडीच्या इतिहासात सामाजिक एकोप्याचा एक सुंदर अध्याय म्हणून नोंदवला जाणार आहे. कोळपेवाडीकरांनी आजवर जपलेल्या आपुलकी, बंधुभाव आणि सर्वधर्मसमभावाच्या संस्कृतीचे हेच खरे दर्शन असल्याची भावना ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे. हरिनामाच्या गजरासोबत माणुसकीचा संदेश देणाऱ्या कोळपेवाडीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

(पान १ वरून)

## कोतवाली पोलिसांचा ट्रिपल धमाका

तिघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून १५ हजार रुपये किमतीच्या मेफेनटरमाईन सल्फेटच्या ४० बाटल्या आणि दुचाकी असा एकूण ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

स्वस्तिक बसस्थानक परिसरातून भास्कर गंगाधर जाधव (रा. लोहगाव ता. नेवासा) यांचा चोरीस गेलेला ७८ हजार रुपयांचा मोबाईल कोतवाली पोलीस शोध पथकाने सीसीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास करत आरोपी मोहम्मद इम्रान मोहम्मद जुबेर शेख (वय २१, रा. झारखंड) यास ताब्यात घेऊन चोरीचे दोन मोबाईल हस्तगत केले.

## जायकवाडीचे पाणी पूर्वभागाला मिळण्यासाठी सर्वपक्षीय एकजूट

जि.प.सदस्या सौ.हर्षदा काकडे, जगन्नाथ गावडे, रामनाथ घोरतळे, राम अंधारे, विश्वनाथ कुढेकर, भाऊसाहेब घोरतळे, भास्कर मासाळ, मिठू काजळे, भगवान बोडखे, राम पोटफोडे, अशोक ढाकणे, लक्ष्मण राठोड, अंबरनाथ बर्डे, माणिक गर्जे, शाहूराव खंडागळे, ज्ञानेश्वर रसाळ, शहादेव खेडकर, भाऊसाहेब सातपुते, सर्जेराव घोरपडे, आदिनाथ सुडके, सुनील गर्जे, विठ्ठल केदार, रामेश्वर पोटभरे, रामकिसन घनवट, भिमराव चेमटे, भागवत भोसले, नवनाथ खेडकर, राजू भांगरे, सुनिल गायके, प्रकाश गर्जे, रामनाथ भालेराव, अशोक पातकळ यांच्यासह युवक, महिला व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलतांना ॲड.काकडे म्हणाले की, जायकवाडीच्या पाण्यातून ताजनापूर लिफ्ट टप्पा क्र.०१ व टप्पा क्र.०२ साठी सातत्याने संघर्ष केला. त्यासाठी मी कै.अजित पवार, शरद पवार, देवेंद्र फडणवीस व एकनाथ शिंदे यांची मदत घेतली असून दुष्काळी भागातील शेतीला पाणी मिळावे यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र, केवळ आश्वासनांवर विसंबून न राहता हक्काचे पाणी मिळेपर्यंत संघर्ष सुरू ठेवावा लागेल. ''पाणी हाच धर्म आणि जात आहे. त्यामुळे पाण्याच्या प्रश्नावर जात-पात व पक्षीय मतभेद बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र यावे. पाणी कोणाच्या बापाचे नाही, ते आपल्या हक्काचे आहे,'' असा आपला निर्धार आहे. त्यामुळे आता बेफिकीर राहून चालणार नाही. या पाण्यासाठी गावागावांत बैठका घेऊन जनजागृती करावी लागणार असून हा बैठकीतून त्याचा शुभारंभ आहे. तुम्ही सर्वांनी साथ दिली तर पाणी दूर नाही. इतर तालुक्यातील पुढारी हे पाणी पळविण्याच्या बेतात आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनो आजच सावध व्हा व आपल्या पाण्याच्या मुद्द्यावर संघटीत व्हा. राजकीय विरोध, प्रशासनाची अनास्था आणि विविध अडचणींचा सामना करावा लागणार असून त्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने समिती स्थापन करून आंदोलनाची दिशा ठरविण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. सौ.हर्षदा काकडे म्हणाल्या की, पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेऊन एकत्र येणे आवश्यक आहे. ही केवळ एक बैठक नाही, तर शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यासाठी एकत्रितपणे उभे राहण्याची सुरुवात आहे. ताजनापूर टप्पा क्र.०२ योजना महिलांच्या मोठ्या सहभागामुळेच मंजूर झाली. त्यामुळे या लढ्यात देखील महिला व युवकांना मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन लढा उभारावा. या प्रश्नासाठी या दुष्काळी ३२ गावातील महिला व युवकांच्या भेटी घेऊन याबाबत जनजागृती करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. या बैठकीचे सूत्रसंचालन हरी फाटे, प्रास्ताविक अंबर बर्डे यांनी तर आभार माणिक गर्जे यांनी मानले.

**या ३२ गावांचा सहभाग :** हातगाव, कांबी, बोधेगाव, बालमटाकळी, गायकवाड जळगाव, सुकळी, शेकटे बु,. शेकटे खु., बाडगव्हाण, मुरमी, शोभानगर, गोळेगाव, लमानतांडा, नागलवाडी, खडके, मडके, लाडजळगाव, सोनविहीर, ठाकूर पिंपळगाव, चेडे चांदगाव, बेलगाव, सुळे पिंपळगाव, पिंगेवाडी, अंतरवाली खु., कोनोशी, आधोडी, दिवटे, शिंगोरी, राणेगाव, मुंगी, खामपिंपरी, लखमापुरी.

## एमआयडीसी परिसरातील कुंटणखान्यावर छापा

प्रशिक्षणार्थी उपअधीक्षक कल्पना पवार, एलसीबीचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे तसेच उपनिरीक्षक संदीप दरवडे, पोलीस अंमलदार विकास साळवे, विष्णु भागवत, शाहीद शेख, बिरप्पा करमल, अशोक लिपणे, विजय ठोंबरे आणि महिला अंमलदार चिमा काळे यांच्या पथकाने केली.